# -:प्रश्नपत्रिका आराखडा:-

| अ.क्र. | विषयाचे नाव | एकूण गुण | एकूण प्रश्न | कालावधी | वेळ | पात्रता गुण (प्रत्येक विषयात किमान) |
|---|---|---|---|---|---|---|
| 01. | बौध्दिक क्षमता चाचणी<br>Mental Ability Test | 100 | 100 | 120 मिनिटे (फक्त दृष्टी अपंगांसाठी 30 मिनिटे जादा वेळ) | 10.30 ते 12.30 | 40% (SC, ST व दिव्यांग 32%) |
| | | | विश्रांती | | | |
| 02. | शालेय क्षमता चाचणी<br>Scholastic Aptitute Test | 100 | 100 | 120 मिनिटे (फक्त दृष्टी अपंगांसाठी 30 मिनिटे जादा वेळ) | 13.30 ते 15.30 | 40% (SC, ST व दिव्यांग 32%) |

**अ) पेपर -1ला :- बौध्दिक क्षमता चाचणी** (MAT)

ही मानसशास्त्रीय चाचणी असून, त्यामध्ये कार्यकारणभाव, विश्लेषण, संकलन इत्यादी संकल्पनांवर आधारित 100 बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न असतील. = एकूण 100 गुण

**ब ) पेपर - 2रा :- शालेय क्षमता चाचणी** (SAT)

ही सामान्यत: 9 वी व 10 वीच्या नविन अभ्यासक्रमांवर आधारित असेल. त्यामध्ये 1) सामान्य विज्ञान 2) समाजशास्त्र 3) गणित असे तीन विषय असतील. या तीन विषयांचे एकूण 100 प्रश्न सोडवायचे असतात.

सामान्य विज्ञान 40 गुण+समाजशास्त्र (इतिहास, राज्यशास्त्र व भूगोल)- 40 गुण+गणित व भूमिती- 20 गुण = एकूण 100 गुण

➢ **उपविषयवार गुणांची विभागणी खालीलप्रमाणे असेल.**

**a)** सामान्य विज्ञान 40 गुण:- भौतिकशास्त्र 13 गुण, रसायनशास्त्र 13 गुण, जीवशास्त्र 14 गुण.

**b)** सामाजिक शास्त्र 40 गुण:- इतिहास 16 गुण, राज्यशास्त्र 08 गुण, भूगोल 16 गुण.

**c)** गणित 20 गुण :- बिजगणित 10 गुण, भूमिती 10 गुण.

**2)** **माध्यम:-** प्रश्नपत्रिका मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराथी, उर्दु, कन्नड व तेलुगू या सात माध्यमातून उपलब्ध असतील. (सर्व विद्यार्थ्यांना मूळ माध्यमाबरोबर इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका एकत्र देण्यात येणार आहे.) यापैकी कोणतेही एकच माध्यम घेता येईल. प्रश्नपत्रिकेत काही शंका निर्माण झाल्यास इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका मूळ प्रत म्हणून पहावी. दोन्ही प्रश्नपत्रिकांसाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिल्या जातील. प्रत्येक प्रश्नक्रमांकापुढे पर्यायांसाठी 4 वर्तुळे असतील. योग्य पर्यायाचे वर्तुळ काळे/निळे बॉलपेनने पूर्णत: रंगवून उत्तर नोंदवायचे आहे. पेन्सिलचा वापर केलेली व अपुरी उत्तरे यांना गुण दिले जाणार नाहीत. एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदविलेली उत्तरे, व्हाईटनर/खाडाखोड करुन नोंदविलेली किंवा गिरवलेली उत्तरे यांना गुण दिले जाणार नाहीत.

**3)** **पात्रता गुण :-** MAT व SAT विषयासाठी प्रत्येक विषयात General संवर्गासाठी 40% गुण व S.C, ST व दिव्यांगासाठी 32% गुण आवश्यक आहेत.